24

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(लोककर्म विभाग)

सतरंजीपुरा झोन क्र.7, नागपुर–440008

दुरध्वनी क्र –2767339

क्रमांक मनपा / Z-7 / स्लम / 82 I (D) ||                                                    दिनांक :– 25/02/26

## अनधिकृत बांधकामाबाबत कारणे दाखवा नोटिस

### महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम 1971 च्या कलम 3 झेड–1 (1)अन्वये

मोहम्मद मुखतार
सेक्रेटरी अशरफ़िया मस्जिद,
लालगंज, राऊत चौक,
मेंहदीबाग रोड, नागपूर

आपणांस या करणे दाखवा नोटिस व्दारा कळविण्यात येते की,

1. राज्य शासनाच्या सुधारीस निर्णय कायदयान्वये दि. 01/01/2000 नंतरच्या झोपडया/बांधकामे यांना कोणतेही सरक्षण न देता त्याचे निष्कासन करणे. त्या अनुषाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम 1971 अंमलात आल्यानंतर माझ्या निदर्शनास आले की दि. 02.02.2026 च्या तक्रारी वरून/अभिलेख/माहिती/अधिकारी यांच्या प्रतिवृत्ती वरून आपण मौजा नागपूर प्लॉट क्र. 223, सीटी सर्वे नं. 162 व 170 शिट क्र. 121 हया सरकारी/नझुल/मनपा/नासुप्र/खाजगी इत्यादी बांधकाम केलेल्या जागेचे एकुण क्षेत्रफळ 283.2 चौ.मी. या मापाचे पक्के बेकायदेशीर/अनधिकृत निवासी बांधकाम खालील बाबीची पुर्तता न करता दि. 04.02.2026 चे मौका तपासणीत आढळून आलेले आहे.
2. अ) प्रस्तुत कायदयान्वये आवश्यक असलेल्या परवानगी न घेता
   ब) दिलेल्या परवानगीला अनुसरून नसल्याप्रमाणे
   क) विकासाची परवानगी रदद केल्यानंतर
   ड) सुधारीत परवानगीचा भंग करून
3. सदर्हु जागा ही महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम 1971 अंतर्गत घोषीत झोपडपट्टी बैरागीपूरा स्लम कोड क्र. 166 हया क्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याने मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुम्हाला नोटिस बजावण्यात येते की, तुम्ही यात नमुद केलेले बेकायदशीर/अनधिकृत निवासीं बांधकाम कलेले असल्याची खात्री झाली आहे. त्या करीता उक्त अनधिकृत निवासी बांधकाम पाडण्याचे आदेश का देण्यात येवु नये याबाबत हा नोटिस प्राप्त झाल्यापासुन 07 दिवसा चे आत उक्त बांधकाम बेकायदेशीर नाही हे सिध्द करण्यासाठी आवश्यक दस्तावेजासह सक्षम प्राधिकरण समोर हजर रहावे. आपण उपस्थित राहण्यात कसुर केल्यास नमुद निवासी बांधकाम अनधिकृत असल्याचे समजण्यात येईल व नमुद बांधकाम 15 दिवसा चे आत पाडण्याचा आदेश देण्यात येईल.

A. Rohgare
27-2-2026
समय 5-36

Scanned with OKEN Scanner

4. संबंधीतांनी आदेशात नमूद अनधिकृत बांधकाम विहित मुदतीत पाडले नाही किंवा कोणत्याही अपीलीय प्राधिकरण व न्यायीक प्राधिकरणाने आदेशाला स्थगीती दिली नसल्यास, संबंधीत सहा. आयुक्त यांनी सक्षम प्राधिकरण (झोपडपट्टी) यांनी पारीत केलेले आदेशानुसार अनधिकृत बांधकाम विहित मुदतीनंतर त्वरीत पाडावे. याची कृपया नोंद घ्यावी.

**अनधिकृत बांधकामाचा तपशील**

| माळा | मुखंडाच्या / इमारतीच्या अनाधिकृत बांधकाम | अनधिकृत बांधकामाचा मोजमाप(चौरस मीटरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| तळ मजला | तळ मजल्यावरील संपुर्ण बांधकाम | 11.8 X 12.00 = 141.6 sqm | Open Space |
| पहिला मजला | पहिल्या मजल्यावरील संपुर्ण बांधकाम | 11.8 X 12.00 = 141.6 sqm | Double Height Area |
| | एकुण | 283.2= sqm | |




G.F. + F.F.

कार्यकारी अभियंता तथा
सक्षम प्राधिकारी (स्लम)
म.न.पा.नागपूर

उप. अभि.
झोन क्र.7
म.न.पा.नागपूर

कनिष्ठ अभि
झोन क्र. 7
म.न.पा.नागपूर

## कार्यकारी अभियंता तथा सक्षम प्राधिकारी, नागपूर महानगरपालिका महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम -१९७१ यांचे समक्ष

**प्रकरण क्र.६२२/स्लम/३-झेड-१(१)/ २०२५-२०२६**

१) श्री. मोहम्मद मुख्तार वल्द मोहम्मद रफीक खान,
सचिव, अशरफिया मस्जीद,
रा. लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड,
नागपूर.

२) श्री. तौसिफ मौलासाहेब नायकवडी,
जिल्हा वक्फ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
पहिला मजला, हज हाऊस,
गंजीपेठ, नागपूर.

३) श्री. मोहम्मद जावेद खान,
अध्यक्ष, अशरफिया मस्जीद,
रा. लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड,
नागपूर.

४) सहा. आयुक्त व ईतर,
विभागीय कार्यालय क्र. ७, सतरंजीपूरा,
महानगरपालिका, नागपूर.

Slum Deptt. Nagpur Municipal Corporation

## -: आदेश :-

**(दि. ०३ जुलै २०२६ रोजी आदेश पारीत)**

महाराष्ट्र शासनाचे दि. २३/०४/२०१५ रोजीचे अधिसुचनेनुसार कार्यकारी अभियंता(झोपडपट्टी), महानगरपालिका, नागपूर या पदास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम - १९७१ चे कलम ३(१) अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यातील अनुसुची स्तंभ ३ नुसार नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व प्रकारच्या मालकीच्या जमीनीकरीता कलम ४(१) अन्वये अधिसुचित करण्यात आलेल्या विर्निर्दिष्ट क्षेत्रांकरीता प्राधिकृत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम -१९७१ चे कलम ३-Z-१(१) अन्वये सतरंजीपूरा झोन क्र. ७ अंतर्गत अशरफिया मस्जीद, लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर यांचे सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाविरुध्द दि. ०२/०२/२०२६ रोजी सहा. आयुक्त, सतरंजीपूरा, झोन क्र. ७ यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली व तक्रारीनुसार मौका चौकशी करण्यात आली. या अनुषंगाने विभागीय कार्यालयामार्फत दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर अशरफिया मस्जीदचे अनधिकृत बांधकामासंबंधात जागेचे मालकी हक्काचे कागदपत्रे, मंजूर नकाशाची प्रत इत्यादी २४ तासाचे आत कार्यालयीन वेळेत सादर करण्याबाबत तसेच सुरु असलेले बांधकाम त्वरीत बंद करण्याकरीता सचिव, अशरफिया मस्जीद, श्री मोहम्मद मुख्तार यांना निर्देशीत करण्यात आले. त्याचे उत्तरादाखल मस्जीद अशरफिया ट्रस्ट, लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर चे सचिव, श्री. मोहम्मद मुख्तार यांनी दि. ०४/०२/२०२६ रोजी उप अभियंता, सतरंजीपूरा झोन क्र. ७, म.न.पा., नागपूर येथे विक्रीपत्राची प्रत, मोजमाप नकाशा, महाराष्ट्र सरकार तर्फे प्राप्त अनुसुची “अ” सनद, घर क्र. २२३, वार्ड क्र. ४१, अशरफिया मस्जीद, लालगंजचे नावे असलेले सन २०२५-२६ चे मालमत्ता कर देयक, दि. १५/०७/२०१४ चे अध्यक्ष, मस्जीद अशरफिया, लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर या नावाचे धारणाधिकार “अ” असलेल्या ९७.७ चौ.मी. क्षेत्राचे, नगर भुमापन क्र. १६२, शिट क्र. १२१, प्रमाणे दि. १८/१०/१९७९ चे नागपूर सुधार प्रन्यास द्वारे मंजूर करण्यात आलेला १४२.४२ चौ.मी. एकुण क्षेत्रफळाचा मंजूर नकाशा व ईमारत बांधकाम परवाना इत्यादी कागदपत्रे सादर केले.

याबाबत विभागीय कार्यालय क्र. ७ यांचेतर्फे प्रत्यक्ष मौका निरीक्षण करण्यात आले असून सदर बांधकाम नविन व अनधिकृत असल्याची खात्री झाली आहे.

त्यानुसार सदर अनधिकृत बांधकामाविरुध्द दि. २५/०२/२०२६ रोजी विभागीय कार्यालय सतरंजीपूरा, झोन क्र. ७ तर्फे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम -१९७१ चे कलम ३-Z-१(१) अन्वये कारणे दाखवा नोटीस तयार करुन मंजूरीस्तव सक्षम प्राधिकरण(स्लम) यांचे कार्यालयात पाठविण्यात आले. या प्रस्तावास दि. २५/०२/२०२६ रोजी मंजूरी प्रदान करुन नोटीस स्वाक्षरी करुन तामील करण्यास्तव मुळ नस्तीसह विभागीय कार्यालयात पाठविण्यात आले. सदर कारणे दाखवा नोटीस क्र. म.न.पा./Z-७/स्लम/३-झेड-१ (१)११, दि. २५/०२/२०२६ मध्ये नमूद केल्यानुसार उक्त बांधकाम बेकायदेशीर व अनधिकृत नाही, हे सिध्द करण्यासाठी हा नोटीस प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत आवश्यक दस्ताऐवजासह सक्षम प्राधिकरणासमोर हजर राहण्याबाबत तसेच उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदर बांधकाम अनधिकृत घोषीत करण्यात येईल व १५ दिवसाचे आत पाडण्याचा आदेश देण्यात

येईल, असे सदर कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद करण्यात आले होते. या नोटीसमध्ये जागेचे एकुण क्षेत्रफळ २८३.२ चौ.मी. या मापाचे असल्याबाबत दर्शविण्यात आले आहे. तसेच या जागेचे मालकी हक्काचे कागदपत्र विभागीय कार्यालयास सादर करतांना श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद,लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर यांचे स्वाक्षरीने प्राप्त झाल्याने उपरोक्त कारणे दाखवा नोटीस त्यांचे नावे व अशरफिया मस्जीदचे नावे तामील करण्यात आला आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम -१९७१ चे कलम ३६ नुसार सदर नोटीस तामील करण्याची कार्यवाही करण्यास वरीलप्रमाणे सुचित केल्यानुसार सदर कारणे दाखवा नोटीसविरुध्द विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत सक्षम प्राधिकरण (स्लम), म.न.पा. यांचे समोर उपस्थित राहून त्यांचे बांधकाम अनधिकृत व बेकायदेशीर नाही हे सिध्द करण्याकरीता आवश्यक दस्ताऐवजासह कोणीही संबंधित हजर झाले नाही. त्याकारणाने संबंधितांस नोटीस प्राप्त झाल्यानंतर जवळपास ५२ दिवसानंतर म्हणजेच दि. १०/०४/२०२६ रोजी सक्षम प्राधिकरणातर्फे या कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने प्रकरणाच्या मूळ नस्तीमधील प्रत्यक्ष मौका चौकशी अहवाल, जी.पी.एस. छायाचित्र व दस्ताऐवजांचे आधारे आदेश पारीत करण्यात आला.

दि. १०/०४/२०२६ च्या आदेशाविरुध्द दि. १३/०४/२०२६ रोजी श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद, लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर यांनी मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय अधिकारी (स्लम) नागपूर यांचे न्यायालयात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम - १९७१ चे कलम ३५ अन्वये अपील दाखल केली. सदर अपिल प्रकरणात सूनावणी घेण्यात येवून दि. ०२/०५/२०२६ रोजी अपर जिल्हाधिकारी, नागपूर तथा प्रथम अपिलीय अधिकारी (स्लम) तर्फे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आला आहे.

**" अपिलार्थीची अपिल अंशतः मंजूर करण्यात येत आहे व सक्षम प्राधिकारी यांनी स्लम प्रकरण क्र. 622/स्लम/3-झेड-1(1)/2025-26 मध्ये पारीत केलेला दि. 10/04/2026 चा आदेश रद्द करण्यात येत असून, प्रकरण सक्षम प्राधिकारी स्लम यांचेकडे फेरचौकशी तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कायद्यात विहित केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब व अपीलार्थी यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीची योग्य व पुरेशी संधी देऊन नियमानुसार आदेश पारित करण्याकरिता परत (Remand Back) करण्यात येत आहे".**

मा. अपिलीय अधिकारी (स्लम) यांचे दि. ०२/०५/२०२६ रोजीचे आदेशान्वये अपीलार्थी यांची फेर सुनावणी दि. ०४/०६/२०२६ रोजी घेण्यात आली व त्याकरीता पत्र क्र. १६३/स्लम/२०२६,

दि. २७/०५/२०२६ रोजी प्रत्यक्षपणे, तसेच पोष्टाद्वारे सुनावणी नोटीस तामील करण्यात आला व तो त्यांना प्राप्त झाला आहे. या दरम्यान जिल्हा वक्फ अधिकारी, नागपूर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचे द्वारे या प्राधिकरणास वक्फ मंडळाची बाजू मांडण्याकरीता दि. १५/०४/२०२६ चे पत्र प्राप्त झाले. त्यामुळे श्री. तौसिफ मौलासाहेब नायकवडी, जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, वक्फ मंडळ, पहीला मजला, हज हाऊस, गंजीपेठ, नागपूर यांना सुध्दा पत्र क्र. १६९/स्लम/२०२६, दि. ०१/०६/२०२६ रोजी आवश्यक दस्तावेजासह व लेखी निवेदनासह दि. ०४/०६/२०२६ रोजी सक्षम प्राधिकरणासमोर उपस्थित राहण्याकरीता नोटीस तामील करण्यात आला.

दि.०९/०६/२०२६ रोजी मो.जावेद खान, अध्यक्ष, अशरफिया मस्जीद, लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर यांचा मध्यस्थीकरीता अर्ज प्रकरणात सुनावणी दरम्यान प्राप्त झाला. सदर अर्जात त्यांची बाजु मांडण्याकरीता अर्ज स्विकार करण्याची विनंती करण्यात आली आहे.

उपरोक्तनूसार दि. ०९/०६/२०२६ दि. १६/०६/२०२६ व दि. १८/०६/२०२६ रोजी सर्व संबंधितांची सूनावणी घेण्यात आली व त्यांनी सादर केलेल्या पूराव्यादाखल, कागदपत्रे, (Pursis), लिखीत युक्तीवाद, निवेदने व उत्तरे दाखल करण्यात आली. त्यांचे थोडक्यात विवरण खालीलप्रमाणे आहे.

**अर्जदार श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद लालगंज, मेहंदीबाग रोड, नागपूर यांचे संक्षिप्त लेखी निवेदन**

दि. १८/०६/२०२६ रोजी अर्जदार श्री. मोहम्मद मुख्तार वल्द मोहम्मद रफिक खान, सचिव, अशरफिया मस्जीद, लालगंज, राऊत चौक, नागपूर यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले व त्याप्रमाणे त्यांचे आक्षेप पुढील प्रमाणे आहे.

१. त्यांना लेखी युक्तीवाद सादर करण्याची संधी न देता प्रकरण अंतिम आदेशाकरीता बंद करण्यात आले.
२. विभागीय कार्यालयातर्फे सदर नोटीसमध्ये आवश्यक दुरुस्ती केली नाही व मागणी केलेली कागदपत्रे पुरविण्यात आली नाही.
३. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार म.न.पा.च्या मानक कार्यपध्दतीचे पालन झाले नाही. त्यामुळे नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीकोनातुन अंतिम आदेश देण्यापुर्वी मागणी केलेली माहिती देवून त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी, अशी विनंती केली आहे.

या संबंधी उपरोक्त नूसार विभागीय कार्यालयाकडून प्राप्त प्रकरण क्र. ६२२/स्लम/अपील/२०२६ अर्जदारास संपूर्ण मुळ नस्तीचे निरिक्षण देण्यात आले याबाबत त्यांना नस्तीतील कागदपत्रे मागणी

करण्याकरिता कोणताही अर्ज सादर केला नाही. त्यामूळे त्यांना कागदपत्रे प्राप्त झाले नाही असे त्यांचे म्हणणे संयुक्तीक नाही.

मध्यस्थीच्या अर्जा वर अर्जदार सचिव, श्री. मो. मुख्तार यांनी लिखीत उत्तर सादर केले असून त्यावर त्यांची सुनावणी घेण्यात आली व त्यांचे मौखीक निवेदन संपूर्णपणे ऐकण्यात आले.

मा. अपर जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये सक्षम प्राधिकारी (स्लम) यांचे दि. १०/०४/२०२६ चा आदेश रद्द करण्यात आला असून त्यामध्ये नोटीस मागे घेण्याबाबत अथवा दुरुस्तीबाबत कोणतेही निर्देश प्राप्त नाही. त्यामुळे अर्जदाराचे म्हणणे खारीज करण्यात येते.

अर्जदारास त्यांचा लेखी युक्तीवाद सादर करण्याकरीता त्यांना दि. १८/०६/२०२६ पेशी तारीख देण्यात आली. परंतु त्यांनी या तारखेस लेखी युक्तीवाद सादर न करता फक्त लेखी निवेदन सादर केले. त्यांना लिखीत व मौखिक युक्तीवाद दाखल करण्याकरीता नैसर्गीक न्यायतत्वावर संपुर्ण संधी दिल्यानंतरही त्यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद सादर केला नाही.

करिता त्यांचे दि. १८/०६/२०२६ चे लेखी निवेदन खारीज करण्यात येते.

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचे संक्षिप्त लेखी निवेदन

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे लिखीत निवेदन, त्यांनी दाखल केलेली संपुर्ण कागदपत्रे, मध्यस्थीच्या अर्जाची प्रत देण्यात आली व त्यावरील दाखल उत्तर स्विकारण्यात आले.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने सादर केलेल्या उत्तर तसेच लेखी युक्तीवाद खालीलप्रमाणे थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत.

अशरफिया मस्जीद यांना देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस बेकायदेशीर आहे. सक्षम प्राधिकारी यांना याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार नाही. योग्य निरिक्षण अहवाल सादर केलेले नाही व सुनावणीची पुरेशी संधी दिलेली नाही. तसेच सदर क्षेत्र झोपडपट्टी अधिसुचित असल्याबाबत पुरावा नाही. त्यामुळे अधिकार क्षेत्राचा अभाव, नैसर्गीक न्यायाचा भंग, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशांचे उल्लंघन, वक्फ मालमत्तेची संरक्षण व धार्मिक स्वातंत्र्य या आधारावर सदर कारणे दाखवा नोटीस रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या वतीने दाखल उत्तर व कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली व लिखीत युक्तीवादाचे अवलोकन करण्यात आले तसेच त्यांचे म्हणणे संपूर्णपणे ऐकण्यात आले.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे म्हणण्यानुसार त्यांचे पंजीकृत संपत्तीकरीता, त्यांचे मंडळाशिवाय, ईतर कोणत्याही प्राधिकरणास त्या संपत्तीविरुध्द कार्यवाही करण्याचा अधिकार नाही. ही बाब तर्कसंगत व कायदेसंगत नाही. ही संपत्ती जरी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळची असल्याचे ग्राहय धरले तरी सक्षम प्राधिकारी (स्लम) हे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ –झेड अन्वये घोषीत झोपडपट्टीकरीता प्राधिकृत असल्याने वक्फ मंडळाचे वरील निवेदन खारीज करण्यात येत आहे.

**<u>मध्यस्थीकरीता अर्जदाराचे निवेदन</u>**

श्री. मोहम्मद जावेद खान वल्द मोहम्मद युसुफ खान यांनी दि. ०४/०६/२०२६ रोजी या प्रकरणात मध्यस्थीचा अर्ज दाखल केला. त्यानुसार त्यांनी थोडक्यात पूढीलप्रमाणे सादर केले आहे की, ते या अशरफिया मस्जीद ट्रस्टचे अध्यक्ष असून या मस्जीदच्या अनधिकृत बांधकामाचे नोटीस चुकीच्या व्यक्तीला देण्यात आले व त्यावर आदेश पारीत करण्यात आले. सदर मालमत्ता अधिसुचित झोपडपट्टी अंतर्गत येत नाही या मस्जीदचा जुना नकाशा मंजूर असून सुधारीत नकाशा म.न.पा. कडे आवश्यक शुल्कासह सादर करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना सुनावणीची संधी देवून या प्रकरणात त्यांची बाजू मांडण्याकरीता मध्यस्थी म्हणून स्विकार करण्यात यावी, असे सादर केले.

अर्जदाराने सादर केलेले मध्यस्थीचे लिखीत निवेदन व कागदपत्रे दाखल करुन घेण्यात आली. त्यांचे मौखीक निवेदन पुर्णपणे ऐकण्यात आले व या प्रकरणात त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली.

सदर अशरफिया मस्जीद ही एकाच ट्रस्टची असून या प्रकरणात सुरुवातीपासून या ट्रस्टचे सचिव, श्री. मोहम्मद मुख्तार यांनी विभागीय कार्यालय तसेच सक्षम प्राधिकारी (स्लम) तसेच अपिलीय अधिकारी समोर अर्ज अपील व संबंधीत कागदपत्रे दाखल केलेली आहे. कारणे दाखवा नोटीस ही अशरफिया ट्रस्टच्या नावाने देण्यात आली आहे. त्यामुळे अध्यक्षांना नोटीस देण्यात आली नाही, हे तर्कसंगत वाटत नाही. करिता त्यांचा मध्यस्थीकरीता दि. ०४/०६/२०२६ रोजीचा अर्ज खारीज करण्यात येत आहे.

## विभागीय कार्यालय क्र. ७, सतरंजीपुरा यांचे निवेदन व अहवाल

१) दिनांक २५/०२/२०२६ ला निर्गमित केलेल्या महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास) अधिनियम -१९७१ चे कलम ३-Z-१(१) अन्वये नोटीस क्र. म.न.पा./Z-७/स्लम/३-झेड-१ (१)११, दि. २५/०२/२०२६ रोजीचा कारणे दाखवा नोटीस श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद, लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर यांचे नावे काढण्यात आलेला असुन दि. २७/०२/२०२६ रोजी त्यांना प्राप्त आहे.

२) सदर नोटीसनुसार बांधकामाची आवश्यक परवानगी न घेता घर क्र. २२३ वार्ड क्र. ४१, लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर येथे, स्लम कोड क्र. १६६, बैरागीपूरा या घोषीत झोपडपट्टीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या जागेवर तळमजला व पहिला मजल्या वरील एकुण २८३.२० चौ.मी. या मापाचे अनधिकृत बांधकाम केले आहे.

३) सदर प्रकरणात विभागीय कार्यालय, सतरंजीपूरा, झोन क्र. ७, महानगरपालिका, नागपूर यांचेकडील मूळ नस्ती दि. ०८/०४/२०२६ रोजी प्राप्त झाली यामध्ये सदर घराबाबतचा अनधिकृत बांधकामाबाबतचा मौका चौकशी अहवाल, ज्यामध्ये बांधकामाचे जी.पी.एस. छायाचित्र प्राप्त झाले आहे, या अहवालानुसार घर क्र. २२३, लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर येथे सद्यस्थितीत तळमजल्याचे व प्रथम मजल्याचे बांधकाम केले आहे. तसेच हे घर स्लम कोड क्र. १६६, बैरागीपूरा या घोषीत झोपडपट्टीच्या सिमेअंतर्गत येते.

नस्तीतील अहवालानुसार अशरफिया मस्जीद, घर क्र. २२३ वार्ड क्र. ४१, लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूरला महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ च्या अंतर्गत कलम ५४ अन्वये नोटीस क्र. म.न.पा./ससनर/मप्रवनर/कलम५४/०२/२०२५-२०२६, दि. ०६/०२/२०२६ रोजी विभागीय कार्यालय झोन क्र. ०७, महानगरपालिका, नागपूर तर्फे बांधकाम थांबविण्याबाबत नोटीस तामील करण्यात आला आहे. या नोटीसवर विभागीय कार्यालय क्र. ७ तर्फे सुनावणी नोटीस दि. १८/०२/२०२६ रोजी देण्यात आलेला असुन विभागीय कार्यालयात सुनावणी घेण्यात आली आहे. "सुनावणी दरम्यान गैरअर्जदार यांच्या वतीने सादर केलेल्या दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता, उक्त बांधकामाची जागा अधिसुचित झोपडपट्टी बैरागीपुरा (स्लम कोड क्र. १६६) या क्षेत्रामध्ये असल्याने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३-झेड-१(१) अन्वये नोटीस तयार करुन

मंजूरीस्तव स्लम विभागाकडे पाठविण्यात आले आहे" व त्यानंतर सक्षम प्राधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी नोटीस विभागीय कार्यालयामार्फत तामिल करण्यात आले.

प्रकरणातील कारणे दाखवा नोटीस, विभागीय कार्यालयातर्फे प्राप्त नस्तीतील कागदपत्रे व मौका चौकशी अहवालाचे वाचन करण्यात आले, तसेच अनधिकृत बांधकामाचे जी.पी.एस. छायाचित्र अवलोकन करण्यात आले, तसेच महाराष्ट्र वक्फ मंडळाच्या वतीने दाखल उत्तर व लिखीत युक्तीवादाचे अवलोकन करण्यात आले व त्यांचे म्हणणे संपुर्णपणे ऐकण्यात आले त्याचप्रकारे श्री. मो. जावेद खान, अध्यक्ष, अशरफिया मस्जीद यांचे या प्रधिकरणासमोर दाखल मध्यस्थीकरीता अर्जाचे वाचन व अवलोकन करण्यात आले व त्यांचे मौखिक निवेदन ऐकण्यात आले, संबंधितांची संपुर्ण सुनावणी घेण्यात आली. सर्व संबंधीतांना त्यांचे लेखी व मौखीक निवेदन सादर करण्याची संपुर्ण संधी देण्यात आली. यावरुन मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, सदर ठिकाणी तळमजला व प्रथम मजल्याचे एकुण क्षेत्रफळ २८३.२० चौ.मी. अनधिकृत बांधकाम विना परवानगी करण्यात आल्याचे सिध्द होत आहे. त्यानुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>-: आदेश :-</u>

१. लालगंज, राऊत चौक, नागपूर येथिल अशरफीया मस्जीद, घर क्र. २२३, वार्ड क्र. ४१, मेहंदीबाग रोड, नागपूर हे स्थळ स्लम कोड क्र. १६६, बैरागीपूरा या घोषीत झोपडपट्टीच्या सिमाक्षेत्रांतर्गत येत आहे.

२. श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद यांचे नावे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम -१९७१ अंतर्गत कलम ३-झेड-१ (१) अन्वये तामील करण्यात आलेला कारणे दाखवा नोटीस क्र. म.न.पा./Z-७/स्लम/३-झेड-१ (१)११, दि. २५/०२/२०२६ योग्य ठरविण्यात येत असुन कायम करण्यात येत आहे.

३. सदर्हु प्रकरणात महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५४ अन्वये देण्यात आलेला नोटीस क्र. म.न.पा./ससंनर/मप्रवनर/कलम५४/०२/२०२५-२०२६, दि. ०६/०२/२०२६ रद्द करण्यात येत आहे. सदर ठिकाणी पुर्वपरवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करण्यात येवू नये.

४. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम-१९७१ अंतर्गत कलम ३-झेड-१ (१) अन्वये अर्जदारास तामील करण्यात आलेला कारणे दाखवा नोटीस दि. २५/०२/२०२६ योग्य सिध्द झाल्याने तसेच सचिव, अशरफीया मस्जिद यांनी वरीलप्रमाणे त्यांचे बांधकाम नोटीसमध्ये

नमूद अनधिकृत बांधकामास, अधिकृत असल्याबाबत कोणताही पुरावा/मंजूर नकाशा सादर न केल्याने उपरोक्त कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर येथील तळमजला व पहिला मजल्याचे एकुण क्षेत्रफळ २८३.२० चौ.मी. या मोजमापाचे अनधिकृत बांधकाम, दिनांक २२ सप्टेंबर २०२५ चे परिपत्रक क्र. नगर रचना/अनधिकृत बांधकाम/१३७३/२०२५ चे अनुपालन करुन पाडण्याचे आदेशित करण्यात येते.

५. या आदेशान्वये या प्रकरणात वेळोवेळी दाखल सर्व अर्ज/निवेदने निकाली काढण्यात येत आहेत.

६. उपरोक्त नुसार आदेश श्री. मोहम्मद मुख्तार, सचिव, अशरफिया मस्जीद, घर क्र. २२३, वार्ड क्र. ४१, लालगंज, राऊत चौक, मेहंदीबाग रोड, नागपूर व विभागीय कार्यालय, सतरंजीपूरा, झोन क्र. ७, म.न.पा., नागपूर व सर्व संबंधीतांस कळविण्यात यावे.

**नागपूर**
**दि. ०३/०७/२०२६**

**(प्रवीण कोटांगळे)**
**कार्यकारी अभियंता तथा**
**सक्षम प्राधिकारी (स्लम)**
**महानगरपालिका, नागपूर**

Dept. ... al Corporation